MHAM100013152022

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ८२०/२०२२**

महाराष्ट्र सरकार
//वि//
कोंडेश्वर थवरुजी जाधव.

**न्यायनिर्णय**

(निकाल तारीख ०८.१२.२०२५ )

आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ड) अन्वये प्रस्तुतचा खटला दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा खटला संक्षिप्त स्वरुपाचा आहे. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदारांना वेळोवेळी समन्सची बजावणी होवुन देखील साक्षीदार साक्षीकामी न्यायालयात हजर झालेले नाहीत व अभियोगपक्ष देखील प्रस्तुत साक्षीदारांना न्यायालयात हजर ठेवण्यास असमर्थ ठरलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात केवळ पंच साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली असुन इतर साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्ष नोंदविण्यास असमर्थ ठरलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदारांची उपस्थिती वारंवार समन्स काढून देखील शक्य होत नसल्याने मी सदर प्रकरण फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५८ अन्वये थांबवित असुन त्याप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

०२. अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आणि गुन्हयाचा तपशिल पाहता, खालीलप्रमाणे प्रश्न अधोरेखित करण्यात आले व त्यावर खालील नमुद करणांसह निष्कर्ष पुढील प्रमाणे देण्यात आला.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १०.०७.२०२२ रोजी १९.०० ते १९.३० वाजताचे दरम्यान ग्राम धामक येथे आरोपी ५२ लीटर गावठी हातभटटीची दारु विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःजवळ बाळगून असताना मिळून आला असे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

**कारणमिमांसा**

**प्रश्न क्र.१ साठी -**

०३. अभियोगपक्षाने सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता एक साक्षीदारांस तपासले व इतर कागदोपत्री पुराव्यांचा आधार घेतला. प्रस्तुत प्रकरणातील पोलीस साक्षीदार व इतर साक्षीदार हे साक्षीकामी न्यायालयात हजर राहु शकले नाहीत व सरकारपक्ष त्यांची साक्ष अभिलेखावर नोंदविण्यास असमर्थ ठरलेला आहे.

०४. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता तपासण्यात आलेला पंचनाम्यावरील पंच सा.क्र.१ अमोल सुभाषराव इंगोले यांनी त्यांचे पुराव्यादरम्यान दिनांक १०.०७.२०२२ रोजीच्या पंचनाम्यावरील त्यांच्या स्वाक्षरी व्यतिरिक्त इतर संपूर्ण मजकूराचे खंडन केले. त्यांनी त्यांच्या सरतपासात ते पोलीसांसोबत कोठेही गेले नव्हते व त्यांच्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नाही असे कथन केलेले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने सदर साक्षीदारांस उलटतपासात विचारता येतील असे सुचक प्रश्न विचारले. परंतु, सदर साक्षीदारांनी ते पोलीसांसोबत पंचनामा करण्यासाठी गेले नव्हते व त्यांच्यासमक्ष पंचनामा केल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. त्यामुळे, सदरचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा पुराव्यात सिध्द होत नाही.

०५. प्रस्तुत प्रकरणात आरोपी विरुध्द गुन्हा सिध्दतेकामी आवश्यक असलेला रासायनिक विश्लेषण अहवाल या न्यायालयासमोर अभियोगपक्षाने दाखल केलेला नाही. त्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे ज्या साक्षीदारांसमक्ष आरोपीच्या ताब्यातून सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला होता त्या साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहाय्य न केल्यामुळे सदर जप्त मुद्देमाल आरोपीचे ताब्यातून जप्त केला अथवा कसे यावर शंका निर्माण होते. तसेच, ज्या साक्षीदाराने सदर जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यापासून ते रासायनिक प्रयोगशाळेपर्यंत वाहून नेला त्याची देखील साक्ष तपासलेली नाही. त्यामुळे, तपासणीसाठी पाठविलेला मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातून जप्त करण्यात आला होता व तोच रासायनिक प्रयोगशाळेत पाठविणेत आला ही महत्त्वाची बाब सबळ पुराव्यानिशी सिध्द झालेली नाही.

०६. त्याचप्रमाणे, आरोपीच्या ताब्यातून सदर मुद्देमाल ज्या पंचासमक्ष जप्त

करण्यात आला होता त्या घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच अमोल इंगोले यांनी न्यायालयासमोर दिलेल्या त्यांच्या पुराव्यात त्यांच्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून ५२ लीटर गावठी हातभटटीची दारु जप्त करुन त्यामधून रासायनिक विश्लेषणासाठी नमुना काढला होता असे कथन केलेले नाही. त्यामुळे, जप्त मुद्देमाल दारुच होती हे सिध्द झालेले नाही. पंच साक्षीदारांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करण्यास उपयोगी अशी साक्ष न्यायालयासमोर न दिल्यामुळे सदरचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा पुराव्यात सिध्द झालेला नाही. अन्य पुराव्यातून देखील आरोपीच्या ताब्यातून वर नमुद मुद्देमाल मिळून आला हे अभिलेखावर आलेले नाही. सबब, आरोपीच्या कब्ज्यातून सदरचा मुद्देमाल मिळून आला ही बाब सिध्द होऊ शकली नाही.

०७. वरील सर्व कारणांचा विचार करता आरोपी त्याच्या ताब्यात विनापास परवाना ५२ लीटर गावठी हातभटटीची दारु स्वतःजवळ बाळगून त्याची विक्री करीत असताना मिळून आला हे दोषारोप निःसंशयपणे तसेच सबळ पुराव्यानिशी सिध्द करण्यास अभियोगपक्षास अपयश आले आहे या निष्कर्षाप्रत हे न्यायालय आले आहे. परिणामी प्रश्न क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

**<u>प्रश्न क्र.२ साठी</u> -**

०८. वरील विवेंचनेच्या अनुषंगाने प्रश्न क्र.१ चे उत्तर नकारार्थी असल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, प्रश्न क्र.२ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१. आरोपी कोंडेश्वर थवरुजी जाधव यांची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ड) च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामिन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने कलम ४३५२(अ) फौजदारी प्रक्रिया संहिता १९५२३ अनुसार रक्कम रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) चे बंधपत्र देऊन अभियोगपक्षाने सदर प्रकरणात अपील केल्यास त्यात हजर राहण्याची ग्वाही द्यावी.

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रंजना शांतीलाल सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुलसीराम गुप्ता, क्रिमीनल ॲप्लीकेशन नं.३८०/२०१९ मधील क्रिमीनल अपील (एस.टी) नं.३९०/२०१९ या न्यायनिवाडयामध्ये निर्देशित केलेप्रमाणे या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सत्वर पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2025.12.08 14:56:38 +0530

**( एस. ए. राठोड )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
चांदुररेल्वे.

चांदुररेल्वे.
दिनांकः ०८.१२.२०२५